## ७. शिष्यवृत्ती/वाणिज्य विभाग :

१. राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती - कनिष्ठ महाविद्यालय. नवीन मंजूरी व त्याचे पुढील वर्षी नुतनीकरण करणे.

२. संस्कृत शिष्यवृत्ती इ. ९ वी व ११ वी ला नविन मंजूरी व नुतनीकरण.

३. ग्रामीण भागातील हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रत्येक जिल्ह्यास १० संच

४. ग्रामीण भागातील प्रज्ञावान विद्यार्थी (जिल्हा परिषदेस तरतूद देऊन - नियंत्रण प्रस्तूत कार्यालय.)

५. प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती (जिल्हा परिषदेस तरतूद नियंत्रण – प्रस्तूत कार्यालय)

६. वरील सर्व शिष्यवृत्तींचे बीले करणे व चारमाही/आठमाही/अकरामाही अंदाजपत्रक बनवून मा. संचालनालयास सादर करणे.

७. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना टंचाईग्रस्त/अवर्षणग्रस्त विद्यार्थ्यांना फी माफी.

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे नांव | | जिल्हावार संच | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुणे | नगर | सोलापूर | एकूण |
| १. | २. | | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | | ३०८ | २२० | २१२ | ७४० |
| २. | संस्कृत शिष्यवृत्ती | इ. ९ वी. | ४ | ४ | ४ | १२ |
| | | इ. ११वी. | ४ | ४ | ४ | १२ |
| ३. | ग्रामीण भागातील हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | | १० | १० | १० | ३० |

यात टंकलेखन संस्थांना जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून अभिप्राय मागवून व संस्था तपासणी केल्यानंतर नविन मान्यता देण्यात येतात (जी.सी.सी.) त्यांचे नुतनीकरण केले जाते., त्यासंबंधिचा पत्रव्यवहार पहाणे.

मे/ऑक्टोंबरमध्ये होणा-या परीक्षांचे साहित्य वाटप, खर्च व निकाल महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेकडून प्राप्त करुन घेऊन तो संबंधितांना (शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना) वाटप करणे

११ वी/१२ वी विद्यार्थ्यांच्या नावात/जातीत दुरुस्ती करुन बदल करण्यास शाळा/महाविद्यालयांना परवानगी देणे.

## पुणे विभागीय  स्तरावर राबविण्यांत येणारे वैशिष्टयपूर्ण उपक्रम

- पुणे शहरातील इ. ११ वी चे  केंद्रीय पध्दतीने प्रवेश सन १९९४-९५ पासून दिले जातात.
- पुणे विभागातील पुणे जिल्हयामध्ये माध्यमिक शाळांतील संचमान्यता संगणकीय प्रणालीमार्फत करण्यात आली. त्यानुसार . या संगणकीय प्रणालीमार्फत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये माध्यमिक शाळांची संचमान्यता सन २००९-१० या वर्षापासून संगणकाद्वारे केली जात आहे.
- पुणे विभागातील उच्च माध्यमिक विभागातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता सन २००९-१० या वर्षापासून संगणकीय प्रणालीद्वारे व २०१०-११ पासू-न **Online** पध्दतीने  करण्यात येत आहे.
- अध्यापक विद्यालयातील संच मान्यता सन २००९-१० या वर्षापासून संगणकीय प्रणालीद्वारे व  २०१०-११ पासून  **Online** पध्दतीने  करण्याचे प्रस्तावित आहे
- शिष्यवृत्तीच्या गुणवत्ता याद्या व मंजूरी आदेश संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येते.
- महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई या कार्यालयाचे जा.क्र. ४३४५ दिनांक १३.७.२००९  अनुसार स्थानिक स्वराज्य संस्थ्ांचे निवडक शाळांचे (अहमदनगर जिल्हयातील ) आदर्श शाळेत रुपांतर करणे ही योजना सुरु करण्यांत आलेली आहे

---